दैनिक
ठाणे
# जीवनदीप वार्ता
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
RNI NO : MAHMAR/2016/72091
Rs.2/-
कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव
jeevandeepvartanews2020@gmail.com
मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे
सोमवार ❖ ३० सप्टेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - ०९७ ❖ पाने - ४
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

# विधानसभेच्या १२ जागांबाबत तडजोड नाही



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

येत्या विधानसभा निवडणुकीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने राज्यभरात पक्षाचे व जनसंघटनांचे मजबूत काम असलेल्या आणि प्रदीर्घ व यशस्वी लढे केलेल्या केवळ १२ जागांची मागणी महाविकास आघाडीकडे केली आहे. इतर डाव्या व पुरोगामी पक्षांनीही आपला प्रभाव असलेल्या मर्यादित जागांची मागणी केली आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते श्री. शरद पवार, श्री. जयंत पाटील, श्री. उद्धव ठाकरे, श्री. नाना पटोले, श्री. बाळासाहेब थोरात यांची

**राज्यात होऊ घालतलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी जागा वाटपावरून राजकीय पक्षांमध्ये रस्सी खेच सुरू आहे. यादरम्यान मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने मविआकडे निवडणुकीत १२ जागांची मागणी केली आहे. या जागांवरुन कोणतीही तडजोड केली जाणार नाही अशी भूमिका माकपनं घेतली आहे.**

भेट घेऊन याबाबत आपली भूमिका दोन महिन्यांपूर्वीच स्पष्ट केली होती, आणि आपण लढणार असणाऱ्या १२ जागांची यादी या सर्व नेत्यांना तेव्हाच लिखित स्वरूपात सादर केली होती.

महाविकास आघाडीने या १२ जागा माकपला सोडाव्यात व त्यानंतरच उर्वरित जागांच्या बाबत आपसात वाटाघाटी कराव्यात अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली होती. महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्ष मात्र माकप व डाव्या पुरोगामी पान ४ वर ▶▶

> मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पार्श्वभूमीवर जाहीर मागणी करती की विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रातील सर्व डावे व लोकशाहीवादी पक्ष व पुरोगामी संघटनांना महाविकास आघाडीने तातडीने सामावून घ्यावे. निवडणूक लढण्याबद्दल त्यांचे आग्रह अत्यंत प्रामाणिकपणाने विचारात घेतले जाऊन सर्वसमावेशक भूमिका घ्यावी. मात्र तसे झाले नाही तर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी डावे पक्ष व पुरोगामी शक्तींना गृहीत धरणाऱ्यांची असेल.
>
> – डॉ. उदय नारकर
> राज्य सेक्रेटरी

## नायब तहसीलदारांच्या बादलीची सूत्रे विभागीय आयुक्तांच्या हाती !




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केल्यानंतर आता प्रशासनिक हालचालीही जोरात सुरू झाल्या आहे. राज्यातील नायब तहसीलदारांच्या बदलीचे अधिकार मंत्रालय पातळीवरून विभागीय आयुक्त पातळीला हस्तांतरित करण्यात आले आहे.

सोबतच बदलीस पात्र नायब तहसीलदार यांची यादी ही संबंधित विभागीय आयुक्तांना देण्यात आली आहे. या बाबत उद्यापर्यंत बदलीस पात्र सर्व नायब तहसीलदारांच्या बदल्या कराव्या, असे निर्देश मंत्रालयातून जारी करण्यात आले असल्याची माहितीही पुढे आली आहे.

निवडणूक आयोगाने अनेक महिन्यांपूर्वी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदली संदर्भातले नियम स्पष्ट केले होते. मात्र राज्यातील नायब तहसीलदारांच्या बदली प्रक्रियेत त्या नियमांचे पालन करण्यात आले नव्हते. म्हणून राज्याच्या दोन दिवसीय दौऱ्यात निवडणूक आयोगानं या विषयी आपली नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर नायब तहसीलदारांच्या बदलीचे अधिकार मंत्रालय पातळीवरून विभागीय आयुक्त पातळीवर हस्तांतरित करण्यात आले आहे.

**नायब तहसीलदारांच्या बदली बाबत निवडणूक आयोगाची नाराजी**

३ वर्षांपेक्षा जास्त ज्या अधिकाऱ्यांची सेवा झाली त्यांना तात्काळ बदला असे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहेत. पुढच्या दोन तीन दिवसांत बदल्या करा, असे आदेश दिले असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज निवडणूक आयोगाची महत्वाची पत्रकार परिषद आज पार पडली. यामध्ये निवडणुकीच्या संदर्भातील महत्वाची माहिती त्यांनी दिली.

# लाडक्या बहिणींचा तिसरा हफ्ता बँकेत जमा

### लाडक्या बहिणींची नवरात्री, दसरा आणि दिवाळी उत्साहात साजरी होणार

**२९ सप्टेंबर रोजी ३४,७४,११६ बहिणींना ५२१ कोटी रुपयांचा लाभ हस्तांतरित**




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा तिसऱ्या टप्प्याबद्दल महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. नवरात्री आणि दसऱ्यापूर्वी सरकारने लाडक्या बहिणींना गिफ्ट दिलंय. रक्षाबंधनाच्या आधीच लाडकी बहीण योजनेचे जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मानधन महिलांच्या बँक खात्यात जमा झाले होते. आता नवरात्री आणि दसऱ्यापूर्वीच महिलांच्या खात्यात मानधन जमा झाले आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील काही महिलांच्या बँक खात्यात ४५०० रुपये जमा झाले आहेत. त्यामुळे लाडक्या बहिणींची नवरात्री, दसरा आणि दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. आदिती तटकरे यांनी आपल्या एक्स खात्यावर तिसऱ्या टप्प्याबाबत सविस्तर माहिती दिलीय. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभ हस्तांतरणाच्या पान ४ वर ▶▶




### आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नांना यश
## कल्याण तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांसाठी भरघोस निधी

**दै.. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण तालुक्यातील ३५ ग्रामपंचायती मुरबाड विधानसभा मतदारसंघात समविष्ट आहेत. या ग्रामपंचायत अंतर्गत येणारी ६८ गावे व २४ पाड्यासाठी आंतर्गत रस्त्यासाठी या पंचवार्षिक मध्ये आमदार किसन कथोरे यांनी १०५ कोटी रुपये फक्त गावातर्गत रस्त्याच्या कॉंक्रिटी कारणासाठी उपलब्ध करून दिले आहेत

सविस्तर वृत्त पान ४ वर ▶▶

# ठाणे जिल्हा पुन्हा अग्रेसर



**राष्ट्रीय लोक अदालतमध्ये २००३४ प्रलंबित प्रकरणे निकाली**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये न्यायालयात प्रलंबित असणारी २००३४ प्रकरणे निकाली काढून ठाणे जिल्हा पुन्हा एकदा अग्रेसर ठरला आहे. अत्यंत जुनी वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली १० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षे जुनी असलेली एकूण ९५० प्रकरणे निकाली काढण्यात लोकअदालतला यश आले.

ठाणे जिल्हयात मोटार अपघात दाव्याची एकूण २१७ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली असून त्यात एकूण २६,८०,४९,७२२ रूपयांची तडजोड झाली अशी माहिती पान ४ वर ▶▶



# एमएमआर क्षेत्रात पर्यटनाची 'सप्तसूत्री'

### ठाणे विकास परिषदेत महाराष्ट्र पर्यटन विभागाच्यावतीने आराखडा सादर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**ठाणे** : गर्दीने कायम गजबजलेल्या आणि कॉंक्रीटच्या जंगलाचा घट्ट विळखा बसत असलेल्या मुंबई महानगर क्षेत्रातील पर्यटन स्थळांना आणि येथील सार्वजनिक सण उत्सवांना जागतिक पातळीवर पोहचविण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाच्या वतीने 'सप्तसुत्री' असलेला पर्यटन विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये किनारा क्षेत्र, मनोरंजन, पर्यावरण, सांस्कृतिक वारसा स्थळे, प्रायोगिक, साहसी आणि अध्यात्मिक अशा सात घटकांना केंद्रस्थानी ठेऊन हा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. नुकत्याच पार पडलेल्या ठाणे विकास परिषदेत महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या वतीने या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.

राज्यातील विविध पर्यटन क्षेत्रांना चालना मिळावी तसेच पर्यटन क्षेत्राचा विकास होऊन पर्यटकांची संख्या वाढून रोजगार उपलब्ध व्हावेत या दृष्टीने नुकतेच महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या वतीने पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले होते. यामध्ये पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक वाढीबरोबरच, रोजगार उपलब्धी, पर्यटन स्थळांचा विकास काही ठिकाणी पर्यटन क्षेत्रांची उभारणी याबाबत पान ४ वर ▶▶

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

# भाजप कल्याण जिल्हा सचिवांचा शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेमध्ये प्रवेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

भाजपने इथल्या नेत्यांना आवर घालावा अन्यथा महाराष्ट्रात परिणाम होतील - शिवसेना जिल्हाप्रमुखांचा इशारा

कल्याण : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या कल्याण जिल्हा सचिवांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला आहे. कल्याणातील शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. तर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी कल्याणचे माजी आमदार नरेंद्र पवार आणि शहराध्यक्ष वरुण पाटील यांना वेळीच समज द्यावी अन्यथा महाराष्ट्रात त्याचे परिणाम दिसू शकतील अशा शब्दांत शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी भाजपला इशारा दिला आहे.



या पक्ष प्रवेशावेळी कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर, शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, अरविंद पोटे, माजी नगरसेवक जयवंत भोईर, गोरख जाधव, दुर्योधन पाटील, महिला आघाडीच्या नेत्रा उगले, माजी नगरसेविका हर्षाली थविल यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंबिवली येथे राहणारे कल्याण शहर भाजपचे सचिव विलास रंदवे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह भाजपला सोडचिठ्ठी देत शिवसेनेत प्रवेश केला. कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या विकासकामांच्या झंजावताने प्रेरित होऊन आपण शिवसेनेमध्ये प्रवेश करत असल्याची प्रतिक्रिया यावेळी विलास रंदवे यांनी दिली. तर रंदवे यांच्यासह आंबिवली येथील उत्तर भारतीय समाज अध्यक्ष आशा पान ४ वर ▶▶

# पत्रीपुल परिसरातील बॉयलर वाहून नेणारा पुलर उलटला



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** अंबरनाथ एमआयडीसीतून नाशिककडे जाणाऱ्या अजस्त्र बॉयलरचा पुलर उलटून अपघात झाल्याची घटना कल्याण पत्रीपुल परिसरात घडली. रविवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास कल्याण पश्चिममेकडे येणाऱ्या मार्गावर हा अपघात झाला असून त्यामुळे पत्रीपुल परिसरात मोठी वाहतूक कोंडी झाली.

अंबरनाथ येथून ओडिसाला जाण्यासाठी हा अजस्त्र बॉयलर निघाला होता. त्याचवेळी कल्याणच्या पत्रीपुलावरून दुर्गाडीकडे जात असताना त्या चौकातच हा पुलर उलटला. मात्र सुदैवाने पहाटेची वेळ असल्याने रस्त्यांवर फारशी वर्दळ आणि वाहतूक नव्हती. अन्यथा मोठा अनर्थ झाला असता. दरम्यान या उलटलेल्या पुलरमुळे पत्रीपुलावरील कल्याणकडे येणाऱ्या बाजूची वाहतूक प्रभावित झाली आहे. तर क्रेनच्या साहाय्याने हा उलटलेला पूलर बाजूला करण्यासाठी वाहतूक पोलीस प्रयत्न करत होते. सकाळी साडे आठ नंतर हा पुलर बाजूला करण्यात यश आले. परंतु या मार्गावरील वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला होता.

दरम्यान चार तासांच्या अथक प्रयत्नानंतर हा उलटलेला पुलर उचलण्यात आणि अजस्त्र बॉयलर बाजूला काढण्यात पोलिसांना यश आले. त्यामुळे रखडलेली वाहतूक हळूहळू पूर्वपदावर येऊ शकली.

# अक्षय शिंदेच्या मृतदेहावर कडेकोट पोलिस बंदोबस्तात दफनविधी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ शहर प्रतिनिधी**



**उल्हासनगर :** बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा मृतदेह उल्हासनगर येथील शांतीनगर स्मशानभूमीत दफन करण्यात आला. अक्षय याला दफन करण्यास शिवसेना शिंदे गट आणि स्थानिकांनी विरोध केला होता. तसेच दफनासाठी खोदण्यात आलेला खड्डा देखील बुजविण्यात आला होता. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी बळाचा वापर करत स्थानिकांना स्मशानभूमी परिसरातून बाजूला केले. त्यानंतर त्याचा मृतदेह दफन करण्यात आला.


बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणाती आरोपी अक्षय शिंदे याला ठाणे पोलिसांनी चकमकीमध्ये ठार केले होते. मुंबईतील जे.जे. रुग्णालयात त्याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतर त्याचा मृतदेह कळवा येथील ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील शवागृहात ठेवण्यात आला होता. त्याचा मृतदेह दफन करण्यासाठी नातेवाईक जागेचा शोध घेत होते.

परंतु मृतदेह दफन करण्यास स्थानिक नागरिक आणि राजकीय पक्षांनी विरोध केला होता. त्यामुळे अक्षयाचा मृतदेह दफन करण्यासाठी जागा मिळत नसल्याचा दावा करत त्याच्या वडिलांनी शुक्रवारी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मृतदेह दफन करण्यासाठी निर्जन जागा शोधण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. त्यानुसार , मागील दोन दिवसांपासून पोलिसांकडून जागा शोधण्याची प्रक्रिया सुरू होती. परंतु स्थानिकांकडून विरोध केला जात होता. अखेर उल्हासनगर येथील शांतीनगर भागात स्मशानभूमीत अक्षयचा मृददेह दफन करण्याचे निश्चित झाले. तेथील स्मशानभूमीत मृतदेहाच्या दफनासाठी खड्डा देखील खणण्यात आला होता. स्थानिकांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर शिंदे गटाचे कार्यकर्ते स्मशानभूमीत शिरले. त्यांनी स्मशानभूमीतील खड्डा पुन्हा बुजविला. अखेर पोलिसांनी बळाचा वापर करत त्यांना स्मशानातून बाहेर काढले.

रविवारी सायंकाळी अक्षयच्या नातेवाईकांनी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातून मृतदेह ताब्यात घेतला. शववाहिनीद्वारे मृतदेह उल्हासनगर येथील स्मशानभूमीत आणण्यात आला. तसेच जेसीबीच्या बुजविण्यात आलेला खड्डा पुन्हा तयार करण्यात आला. परंतु शववाहिनी दाखल होताच, तेथेही काही नागरिकांनी शववाहिनी अडविण्याचा प्रयत्न केला. सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास अक्षयचा मृतदेह दफन करण्यात आला

# 'पाणी'च्या शीर्षक गीताला लाभला शंकर महादेवन यांचा आवाज

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**




राजश्री एंटरटेन्मेंट आणि पर्पल पेबल पिक्चर्स प्रस्तुत कोठारे व्हिजन प्रायव्हेट लिमिटेड निर्मित 'पाणी' च्या टिझरने चित्रपटाची उत्सुकता ताणली असतानाच आता या चित्रपटातील मनाला उभारी देणारे 'नगं थांबू रं' हे शीर्षकगीत प्रदर्शित झाले आहे. आदिनाथ कोठारे याने शब्दबद्ध केलेल्या या गाण्याला गुलराज सिंग यांनी साजेसे संगीत दिले असून हे प्रेरणादायी गाणे शंकर महादेवन यांनी आपल्या दमदार आवाजात गायले आहे. मराठवाड्यातील हनुमंत केंद्रे या 'जलदूता'ची कहाणी सांगणाऱ्या या चित्रपटाचे शीर्षकगीत अतिशय स्फूर्तिदायी आहे. या गाण्यातून हनुमंत केंद्रे यांचा पाण्यासाठीचा लढा, संघर्ष आणि त्यांना मिळालेले यश निदर्शनास येत आहे.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या गाण्याचे बोल प्रत्येकाच्या मनाला भिडणारे असून नवीन उमेद देणारेही आहे. गावकऱ्यांच्या सहकार्याने पाणीटंचाई सारखी भीषण समस्या सोडवून गावकऱ्यांना आशेचा किरण दाखवणारे हे गाणे आहे. अतिशय भावपूर्ण बोल असलेले हे गाणे संगीतप्रेमींना नक्कीच आवडेल.

या गाण्याबद्दल शंकर महादेवन म्हणतात, 'ज्यावेळी या गाण्याबद्दल मला विचारणा करण्यात आली, तेव्हा मी त्वरित होकार दिला. या गाण्याचे बोल मनाच्या खोलवर रुजणारे आहेत. मनातील खंत, संघर्ष, यश, आनंद अशा सगळ्याच भावना या गाण्यातून एकत्र व्यक्त होत आहेत. हे गाणे गाताना माझ्यातही तितकाच उत्साह होता. अतिशय उत्स्फूर्तदायी गाणे आहे. कोणत्याही कठीण परिस्थितीशी लढा देताना हे गाणे प्रत्येकाला प्रेरणा देणारे ठरेल.'

आदिनाथ कोठारे दिग्दर्शित 'पाणी' चित्रपटात आदिनाथ कोठारे, रुचा वैद्य, सुबोध भावे, रजित कपूर, किशोर कदम, नितीन दीक्षित, सचिन गोस्वामी, मोहनाबाई, श्रीपाद जोशी, विकास पांडुरंग पाटील अशी तगडी स्टारकास्ट आहे. या चित्रपटाची कथा नितीन दीक्षित आणि आदिनाथ कोठारे यांची असून नेहा बडजात्या, दिवंगत रजत बडजात्या, प्रियांका चोप्रा जोनस, डॉ. मधू चोप्रा या चित्रपटाचे निर्माते आहेत तर महेश कोठारे, सिद्धार्थ चोप्रा या चित्रपटाचे सहयोगी निर्माते आहेत. येत्या १८ ऑक्टोबर रोजी 'पाणी' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# 'स्वरगंधर्व सुधीर फडके' चित्रपटाची ऑस्करवारी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

सुधीर फडके म्हणजेच आपल्या सर्वांचे लाडके बाबूजी. संगीत क्षेत्रातील हे एक अजरामर नाव आहे. बाबूजींचा संगीतमय प्रवास उलगडणारा 'स्वरगंधर्व सुधीर फडके' काही महिन्यांपूर्वी प्रदर्शित झाला. महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात या चित्रपटाला प्रेक्षकांनी पसंती दर्शवली. प्रेक्षकांसह श्रीधर फडके, आशा भोसले, माधुरी दीक्षित अशा अनेक दिग्गजांनी या चित्रपटाचे भरभरून कौतुक केले. विशेष म्हणजे अमेरिकेतही या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तिथेही या चित्रपटाचे शोज हाऊसफुल्ल झाले.

प्रेक्षकांचे एवढे प्रेम मिळवल्यानंतर आता हा चित्रपट ऑस्करवारीसाठी सज्ज झाला आहे. फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून २९ चित्रपट स्पर्धेसाठी विचारात घेतली गेले. त्यात योगेश देशपांडे दिग्दर्शित 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या बहुचर्चित चित्रपटाचा समावेश आहे. त्यामुळे आता मराठी सिनेसृष्टीत पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला जाण्याची शक्यता आहे.

याबाबत दिग्दर्शक योगेश देशपांडे म्हणतात, 'ऑस्करसाठी भारताकडून पाठवल्या जाणाऱ्या या वर्षातील सर्वोत्तम २९ चित्रपटांच्या यादीत 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या चित्रपटाची निवड होणे, हे खूप अभिमानास्पद आहे. निर्माते, लेखक- दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ या सर्वांचे प्रामाणिक कष्ट यामागे असतात आणि त्यामुळे प्रत्येकाला हा क्षण आनंद देणारा ठरला. जगातील मोठा समजला जाणाऱ्या ऑस्कर पुरस्काराच्या यादीत आपल्या चित्रपटाचा शेवटच्या फेरीपर्यंत विचार केला जाणे, हे अतिशय मोठे समाधान देणारे आणि पुढील काम करण्यास अधिक ऊर्जा देणारे आहे.''

सौरभ गाडगीळ प्रस्तुत रिडिफाईन प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे सौरभ गाडगीळ आणि योगेश देशपांडे निर्माते आहेत. तर चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन योगेश देशपांडे यांचे आहे. 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या चित्रपटात सुनील बर्वे, मृण्मयी देशपांडे, सागर तळाशीकर, मिलिंद फाटक, आदिश वैद्य, सुखदा खांडकेकर, अपूर्वा मोडक, अविनाश नारकर, शरद पोंक्षे, उदय सबनीस, चिन्मय पटवर्धन, निखिल राऊत, विभावरी देशपांडे, धीरेश जोशी, परितोष प्रधान यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# ६ कोटींची व्हेल माशाच्या उलटीची तस्करी
## तीन आरोपींना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण क्राईम ब्रांचने मोठी कामगिरी करीत सुमारे ६ कोटी २० लाख रुपयांची व्हेल माशांची उलटीची तस्करी करणाऱ्या तीन आरोपीना बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणी तिघा आरोपींना अटक करण्यात आली असून, रायगड जिल्ह्यातून हे तिघे डोंबिवलीत विक्री करण्यासाठी येत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून अनिल भोसले, अंकुश माळी आणि लक्ष्मण पाटील या तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. सध्या तिघांना अटक करून कल्याण न्यायालयात हजर केले असता कल्याण न्यायालयाने त्यांना १ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



कल्याण क्राईम ब्रँन्चच्या घटक-०३ ने एक मोठी कारवाई केली. सहायक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, तीन इसम बदलापूर पाईपलाईन रोड, डोंबिवली येथे मारुती सुझुकी कंपनीची राखाडी रंगाची वॅगनर गाडी (क्रमांक MH 46-BE-5426) घेऊन व्हेल माशाची उलटी विक्रीसाठी येणार होते. मिळालेल्या माहितीच्या आधारे, गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून या इसमांना रंगेहाथ पकडले, या आरोपींची नावे अनिल भोसले (५५) अंकुश माळी (४५) आणि लक्ष्मण पाटील (६३) अशी आहेत. त्यांच्याकडून ५ किलो ६४२ ग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटी जप्त करण्यात आली. ज्याची किंमत सुमारे ६ कोटी २० लाख रुपये आहे, यासोबतच चार चाकी गाडी आणि मोबाईल फोनही जप्त करण्यात आले आहेत.

# सिंचन साहित्य विकत घेताय?
## मग जिल्हा परिषदेच्या योजनेचा लाभ अवश्य घ्या

### कृषी विकास अधिकारी रामेश्वर पाचे यांचे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आवाहन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

शेतात लागवड होणाऱ्या पिकांकरिता संरक्षित पाण्याची आवश्यकता असते तसेच मोकाट पाणी दिल्यामुळे पाण्याचा होणारा अपव्यय टाळण्यासाठी विविध सिंचन साहित्याचा पुरवठा योजना जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता सेस फंड अंतर्गत शेत जमिनीचा पोत सांभाळण्यासाठी व शेतीच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी योजना राबवली जात आहे.

**काय आहे योजना?**

विविध सिंचन साहित्याचा पुरवठा करणे या योजने अंतर्गत डिझेल इंजिन,पेट्रो-डिझेल पंपसंच,पेट्रोल पंपसंच, विद्युत पंपसंच,एचडीपीई पाईप,पीव्हीसी पाईप, २ एच.पी., ३ एच.पी. सिंगल फेज, थ्री फेज इलेक्ट्रीक मोटर व ५ एच.पी. व ७.५ एच.पी. थ्री फेज इलेक्ट्रीक मोटर या साहित्याचा लाभ दिला जातो.

**लाभ किती मिळणार?**

प्रति लाभार्थी सिंचन साहित्य प्रति नग एकुण किंमतीच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रु.३०,०००/-

**कोणाला मिळणार लाभ?**

शेतकऱ्याकडे ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक

शेतमजूर, बचतगट व ग्रामसंघांच्या, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या बाबतीत रोजगार निर्मिती हा उद्देश असल्याने त्यांचे नावे शेतजमीन असण्याची आवश्यकता नाही.

या योजना DBT तत्वावर राबविली जात असल्याने शेतकऱ्याने आधारकार्ड व बँक पासबुक सादर करणे आवश्यक. या योजनेकरिता जिल्ह्यातील सर्व वर्गवारीतील शेतकरी पात्र राहतील.

**अर्ज कुठे करावे?**

लाभार्थ्यांनी तालुका कृषि अधिकारी/ गट विकास अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करावा. कागदपत्रांची छाननी तालुकास्तरीय अधिकारी यांच्या मार्फत करण्यात येईल. पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव अंतिम मंजूरीकरिता जिल्हा स्तरावर सादर करण्यात येईल. लाभार्थी मंजूरीचे अंतिम अधिकार कृषि समितीस राहतील.

**शेतातील उत्पादन वाढीसाठी जिल्हा परिषद सेस फंडा अंतर्गत ८० लाख निधी विविध सिंचन साहित्याचा पुरवठा योजनेसाठी उपलब्ध असून शेतकरी बांधवानी या योजनेसाठी अर्ज करावे.**

***- रामेश्वर पाचे***
***कृषी विकास अधिकारी***

# दुर्गाडी किल्ल्यालगतच्या बेकायदा बांधकामांवर निष्कासन कारवाई



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

कल्याण : कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी किल्ल्या लगतच्या डीपी रस्त्याचे काम महापालिके मार्फत प्रस्तावित आहे. या रस्ता रुंदीकरणामधील एकूण २५ बाधित बांधकामांपैकी आज १५ बाधित बांधकामांवर महापालिकेमार्फत निष्कासनाची धडक कारवाई करण्यात आली. उर्वरित बाधित बांधकामावर तोडक कारवाई सुरू अजूनही आहे. यावेळी तेथील तबेल्यातील सुमारे २५० म्हशी सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आल्या.

या कारवाईदरम्यान महापालिकेचे परिमंडळ १चे उपायुक्त प्रसाद बोरकर,क प्रभागाचे सहा आयुक्त तुषार सोनवणे, ब प्रभागाच्या सहा आयुक्त सोनम देशमुख, ड प्रभागाच्या सहा आयुक्त सविता हिले, क प्रभागातील अतिक्रमण नियंत्रण विभागाकडे कर्मचारी त्याचप्रमाणे बाजारपेठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, इतर पोलीस कर्मचारी महापालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण विभागातील पोलीस कर्मचारी उपस्थित होते. हि कारवाई चार जेसीबी व एक पोकलेन च्या साह्याने करण्यात येत आहे.

# विद्यापीठ सिनेट निवडणुकीत उबाठा गटाचे अल्पेश भोईर विजयी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

खडवली,/मुंबई विधापिठाच्या सन २०२४ च्या सिनेट सदस्याच्या निवडणुकीत शिवसेना उबाठा गटाचे कल्याण व मुरबाड विधानसभा जिल्हा प्रमुख अँड अल्पेश भोईर हे खुल्या गटातुन विजयी झाले असून त्याना११३७इतकी मते मिळाली आहेत, ठाणे जिल्ह्यात प्रथमच सिनेट सदस्य अँड अल्पेश भोईर झाल्याने संपूर्ण ठाणे जिल्ह्यात व प्रामुख्याने ग्रामीण भागात आनंद होत असुन अभिनंदनचा वर्षाव होत आहे,

मुंबई विधापीठ सन २०२४ ची सिनेट दहा सदस्य साठी निवडणूक झाली दहा जागेवर शिवसेनेने बाजी मारली आहे, खुल्या गटातून कोकण विभागातुन ठाणे जिल्ह्यात अँड अल्पेश भोईर यांना सिनेट सदस्य साठी शिवसेना उबाठा गटाकडून अर्ज दाखल केले होते, विजयासाठी १११७ मतांची आवश्यकता होती, त्या प्रमाणे अँड अल्पेश भोईर यांना ११३७ मते मिळाली व विजयी झाले,

यावेळी विजयी उमेदवार अँड अल्पेश भोईर यांनी सांगितले की शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे तसेच युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे व युवासेनेचे सचिव वरुन सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे सिनेट सदस्य विजयी झाले आहेत, प्रथमच ठाणे जिल्ह्याला प्रतिनिधी म्हणून मला संधी दिली आहे, कॉलेजच्या विविध समस्या आसतात त्या दुर करणार, तसेच विध्यार्थ्यांच्या समस्या आडचणी परिक्षा वेळेवर घेणे,वेळेवर रिजेक्ट लागणे,प्रत्येक कॉलेज मध्ये सी सी टिव्ही लावणे, कॅन्टिन व्यावस्था,सौचालय व्यवस्थित अशा विविध समस्या सोडविण्यासाठी आपण मुंबई विधापीठा कडे पाठपुरावा करणार, तसेच कल्याण येथे मुंबई विधापीठाचे उपकेंद्र आहे, तेथे महाविद्यालयान विध्यार्थ्यांन करीता वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करणार, तसेच महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण भागात दजैदार कॉलेज स्थापन करण्यासाठी पाठपुरावा करणार असे सांगितले,




**सोमवार ३० सप्टेंबर २०२४**

**मेष**

दिवस आनंदात जाईल. काम करताना मन शांत ठेवल्यास तुमच्या कामात सहज यश येईल. आपण घाई केल्यास, सर्वकाही चुकीचे होईल. अविवाहितांसाठी नातेसंबंध येऊ शकतात.

**वृषभ**

कुटुंबाशी संबंधित अनेक जबाबदाऱ्या पार पाडाल. या राशीच्या कंत्राटदारांसाठी दिवस चांगला असेल, नवीन करार मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन**

आर्थिक क्षेत्रात स्थिरता राहील. दिवस किंचित अनुकूल असेल. आज अध्यात्माकडे कल असेल आणि मंदिरात जाण्याची किंवा काही धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याची योजना बनवाल.

**कर्क**

कुटुंबातील सदस्य तुमच्या लग्नाचे नियोजन करतील. उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे.कुटुंबात सुरू असलेली कोणतीही समस्या आज दूर होईल.दिवस खूप चांगला आहे.

**सिंह**

आर्थिक स्थिती सुधारेल. दिवस सामान्य असेल. दिवस प्रवासात जाईल. हे प्रवासादरम्यान कार्यालयीन कामाशी संबंधित असू शकते.

**कन्या**

आज आनंद मिळवण्यासाठी स्वभावात काही बदल करण्याची गरज आहे. घरात आनंद नक्कीच राहील. कौटुंबिक समस्या आज आपोआप दूर होतील. ज्यामुळे तुम्हाला आनंद वाटेल.

**तुळ**

ज्या गोष्टींसाठी तुम्ही खूप दिवसांपासून प्रयत्न करत आहात त्या पूर्ण होणार. या राशीच्या मुलांसाठी अभ्यासासाठी दिवस चांगला राहील. कुटुंबासमवेत धार्मिक स्थळाला भेट द्याल.

**वृश्चिक**

प्रवासादरम्यान दूरच्या नातेवाईकाला भेटू शकता. ज्यामुळे तुमचे मन प्रसन्न होईल. या राशीच्या अभियंत्यांसाठी दिवस लाभदायक असेल.

**धनु**

नशीब तुम्हाला पूर्ण साथ देईल. तुम्ही तुमच्या कार्यक्षेत्रात चांगले काम कराल. तुम्ही तुमच्या आई-वडील किंवा बहिणी आणि भावांसोबतही वेळ घालवू शकता. ऑफिसमध्ये नवीन काम करण्याची संधी

**मकर**

दिवस उत्साहाने भरलेला असेल. आज तुमच्या मनात नवीन कल्पना येतील, तुम्ही एखादा नवीन व्यवसाय सुरू करू शकता, ज्याचा तुम्हाला भविष्यात फायदा होईल.

**कुंभ**

विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाईल. तुम्हाला स्पर्धा परीक्षांशी संबंधित काही चांगली बातमी मिळू शकते. तुमच्या प्रियकरासाठी दिवस चांगला आहे.

**मीन**

मित्रांसोबत मजा करण्यासाठी आणि मनोरंजनासाठी दिवस चांगला आहे. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आजचा सकारात्मक दिवस काही बाबतीत विजय मिळवून देईल.

# ठाकुर्ली, कोपर लोहमार्ग पोलीस मदत केंद्राचा शुभारंभ

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍



डोंबिवली: महिलांची सुरक्षा आणि रेल्वे प्रवासात वाढलेले गुन्ह्यांचे प्रमाण लक्षात घेऊन प्रवाशांसाठी कोपर, ठाकुर्ली रेल्वे स्थानकात डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्याअंतर्गत दोन पोलीस मदत केंद्रांचा शुभारंभ रविवारी सकाळी ८ वाजता सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यावेळी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे उपस्थित होते. यांनी त्याबाबत सांगितले की, लोहमार्ग पोलीस आयुक्त रवींद्र शिसवे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या संकल्पनेने मदत केंद्र उभारण्यात आली आहेत. सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, लोहमार्ग पोलीस वरिष्ठ अधिकारी आदी त्यासाठी उपस्थित राहणार आहेत असे उंदरे म्हणाले. ठाकुर्ली व कोपर दोन्ही स्थानकात पश्चिमेला ते मदत केंद्र ठेवण्यात आले असून अहोरात्र पोलीस त्या स्थानकात कार्यरत असतात, त्यांना ऑनड्युटी असताना त्या मदत केंद्राचा लाभ।होईल. तसेच एखादी घटना घडल्यास प्रवाशांना पोलिस सहकार्य हवे असल्यास कुठे जावे याबाबत त्या कक्षातले पोलीस सहकार्य करतील असेही सांगण्यात आले. महिला पोलिसांनी मंत्री चव्हाण यांचे आभार मानले

# शूटिंग स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालयाचे यश

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍



**गोवेली (प्रतिनिधी) :** जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेलीच्या विद्यार्थिनीने शूटिंग स्पर्धेत यश मिळवल आहे. रूपारेल महाविद्यालय आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कामगार क्रीडा मंडळ शूटिंग क्लब प्रभादेवी येथे दि.२७ ते २८/९/२०२४ रोजी आंतर महाविद्यालयीन शूटिंग स्पर्धा झाली. या स्पर्धेमध्ये जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये तिला यश मिळालं आहे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी शर्वरी भोईर (एम कॉम१) हिने १०मीटर पिस्टल स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवले तिची कामगिरी पाहता विद्यापीठाच्या संघात तिची निवड झाली आहे. तिच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे संचालक प्रशांत घोडविंदे प्राचाय.डॉ .के.बी. कोरे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, क्रीडा प्राध्यापक मोहनिष देशमुख यांनी तिचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबईत महिला साहित्य संमेलन संपन्न




व्यासपीठावर डॉ. अरुंधती जोशी,उपाध्यक्ष साहित्य भारती कोकण प्रांत, डॉ. उज्ज्वला चक्रदेव, कुलगुरु एस.एन.डी.टी. विद्यापीठ, श्री. नितीन केळकर, संघटक, साहित्य भारती, महाराष्ट्र, सौ. स्वाती काळे, लेखिका व जॉईंट कमिशनर जी. एस.टी.

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कोकण प्रांत आणि छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय महिला साहित्यिक संमेलन, विवेकानंद संकूल, सानपाडा येथे शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ पार पडले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या तीनशेव्या जयंतीनिमित्त या संमेलन सभागृहास 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सभागृह' असे नांव देण्यात आले होते. महिला संमेलनाची सुरुवात सरस्वती स्तवनाणि पूजनाने झाली. संमेलनाचे उद्घाटन एस. एन. डी. टी. महाविद्यालयाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांनी केले. तर प्रमुख अतिथी जी. एस. टी. कमिशनर, प्रख्यात लेखिका सौ. स्वाती काळे या निमंत्रित होत्या. डॉ. उज्जवला चक्रदेव यांनी आपल्या उद्घाटनीय भाषणात त्यांनी आपल्या मुलींना शिक्षणाने सक्षम करीत असताना त्यांना संस्कृता बनवणे आजच्या काळाची गरज असल्याचे अधोरेखित केले. स्त्रीच्या सात गुणांविषयी त्यांनी सांगितले तसेच त्यांनी सुरू केलेल्या जगराणी प्रकल्पाविषयीही माहिती दिली यासाठी त्या ४५ ऋषिकांचा अभ्यास करून त्यांच्या जीवनावर व्हिडिओ, रिल्स, पुस्तिका तयार केल्या आहेत. 'प्राचीन ती आणि आजची ती' या विषयावर बोलताना सौ. स्वाती काळे यांनी पौराणिक काळापासून आजपर्यंतच स्त्री कशी सक्षम होती हे उदाहरणासह सांगितले. त्याआधी अप्पा जोशी प्रतिष्ठान आणि अखिल भारतीय साहित्य परिषदेच्या डॉ. अरूंधती जोशी यांनी या प्रास्ताविक सादर केले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर सौ. वृंदा टिळक यांनी व्याख्यान सादर केले. यावेळी तसेच अखिल भारतीय साहित्य परिषद साहित्य भारती कोकण प्रांत कार्याध्यक्ष श्री. प्रवीण देशमुख, अखिल भारतीय साहित्य परिषद महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री श्री. नितीन केळकर, अप्पा जोशी प्रतिष्ठान व अखिल भारतीय साहित्य परिषद, नवी मुंबईचे डॉ. नंदकिशोर जोशी या संमेलनास उपस्थित होते. या संमेलनात नवी मुंबईतील मान्यवर महिलांचा सत्कार करण्यात आला.

या संमेलनामध्ये कथाकथन, कादंबरीः बीज व निर्मिती, आवडता विनोदी लेखक आणि काव्य संमेलन अशी विविध विषयाची सत्रे आयोजित केली गेली होती या प्रत्येक सत्रात महिला साहित्यिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन संमेलनास उस्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच 'साहित्यातून महिला सक्षमीकरण' या विषयावर एक लेखन स्पर्धाही आयोजित केली गेली होती, त्या स्पर्धेचा निकाल जाहीर करून विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

समारोपाच्या सत्रामध्ये मुख्य पाहुणे अखिल भारतीय साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री. नरेद्र पाठक, अखिल भारतीय साहित्य परिषद कोकण प्रांत अध्यक्ष श्री. दुर्गेश सोनार उपस्थित होते.

# जेवण बनवण्यावरून वाद पतीने घेतला पत्नीचा जीव



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी)** पेण तालुक्यातील शहापाडा धरण परिसरात (२४ सप्टेंबर) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास एक दुर्दैवी घटना घडली, ज्यात एका पतीने आपल्या पत्नीचे भिंतीवर डोके आपटून ठार मारले.

मिळालेल्या माहिती नुसार ४० वर्षीय पती आणि ४५ वर्षीय पत्नी यांच्यामध्ये जेवण बनवण्यावरून वाद झाला. या वादात पतीने पत्नीला हाताने मारहाण केली आणि नंतर भिंतीवर डोके आपटून तिचा जीव घेतला. याप्रकरणी पतीला अटक करण्यात आली आहे. याबाबत पेण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखलकरण्यात आला असून अधिक तपास पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल करीत आहेत.

ही घटना सामाजिक चिंता वाढवणारी असून घरगुती हिंसाचाराच्या गंभीर समस्या कडे लक्ष वेधते समाजातील सर्वांना जागरूक होण्याची गरज आहे. जेणेकरून अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये.

# परतीच्या पावसाचा फटका
## मुरबाड तालुक्यातील भात पिके आडवी!





डावीकडील छायाचित्रात शेतामध्ये डौलाने डुलत असलेला भात तर उजवीकडे तालुक्यात गेल्या आठवड्याभरात सततच्या पावसामुळे भात शेतातील भाताची रोपे आडवी पडल्याचे चित्र.

### परतीच्या पावसाची मुरबाड तालुक्यात दाणादाण

### हस्त नक्षत्रांचा धुमाकूळ !

### १५५०१ हेक्टरवर भात लागवड !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता : प्रतिनिधी**

मुरबाड दि.२९ : यंदा वरून राजाने सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांना सुगीचे दिवस आणले परंतु दरवर्षीप्रमाणे यंदाही हस्त नक्षत्राच्या पावसाचा सह्याद्री पर्वताच्या रांगेत असणाऱ्या मुरबाड तालुक्यात परतीच्या पावसाचा चांगला दणका बसला आहे यंदा भात पिके जोमात आली आहेत परंतु पाऊस असाच राहिला तर ती कोमात जाण्याची शक्यता आहे त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदील झाला आहे. तालुक्यात १५५०१ हेक्टर वर विविध जातीच्या भात रोपाची लागवड करण्यात आली आहे. परंतु गेली आठवड्याभरात सततच्या पावसामुळे शेतात उंच असलेले भात रोपे सध्याच्या घडीला आडवी पडल्याचे चित्र दिसून येत आहे.

ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड, शहापूर व अन्य तालुक्यात सायंकाळी चार-पाच वाजेनंतर तर कधी दिवसभर परतीच्या पावसाचा धुमाकूळ सुरू आहे पावसाने झोडपले आणि राजाने मारले तर दाद कुणाकडे मागायची अशी अवस्था सध्या शेतकरी राजाची झाली आहे शेतामध्ये उभी असलेली पिके डवलदारपणे उभे आहेत परंतु हस्त नक्षत्राच्या परतीचा पाऊस व सोसाट्याचा वारा यामुळे उभी पिके आडवी होत आहेत त्यामुळे तोंडाशी आलेला घास हस्त नक्षत्राचा पाऊस हिराहून येतो की काय अशी भीती शेतकरी राजाच्या मनात निर्माण होऊ लागली आहे

यंदा सर्वत्र पिके जोमात आल्याने शेतकरी राजा आनंदात आहे परंतु हस्त नक्षत्राच्या पावसाने मात्र त्रिधा त्रिपट उडवली आहे शेतकरी राजा पावसाला विनंती करीत आहे की वरून राजा हातात तोंडाशी आलेला भास हिरावून घेऊ नको रे अशी विनंती करू लागले आहेत मुरबाड तालुक्याच्या सर्वच भागात भात पिकाचे विक्रमी उत्पादन होईल अशी अशा शेतकऱ्यांना आहे परंतु त्यासाठी वरून राजाने आता तरी थांबावे अशी विनवणी शेतकरी राजा करीत आहे.

---------

**" यंदा ग्रामीण भागात अतिशय चांगल्या प्रमाणात पाऊस पडल्याने भात पिके चांगली बहरली आहेत. परंतु गेल्या आठवड्याभरात सतत जोरदार पाऊस पडत आहे त्यामुळे असाच पाऊस पडत राहिला तर तोंडात पडणारा सोन्याचा घास कदाचित मेघराजा हिसकावुन येतो की काय अशी चिंता शेतकरीवर्गाला लागली आहे.**

**रघुनाथ कोंडाजी धुमाळ**
**- शेतकरी, कोरीवळे**

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये १३ हजार ५२९ प्रकरणे निकाली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

पेण( प्रतिनिधी) दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने आयोजित केलेल्या दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी रायगड जिल्ह्यात झालेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण १३ हजार ५२९ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश श्री. अमोल अ. शिंदे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणे तसेच वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. ए. एस. राजंदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल?ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील ५० हजार ७०९ वादपूर्व प्रकरणे व ९ हजार १३२ प्रलंबित अशी एकूण ५९ हजार ८४१ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी १२ हजार १७३ वादपूर्व प्रकरणे व १ हजार ३५६ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण १३ हजार ५२९ प्रकरणे सामंजस्याने मिठवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली असून त्याद्वारे पक्षकारांना एकूण २५ कोटी ५८ लाख ६७ हजार ३६ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.

## (२५ कोटी ५८ लाख ६७ हजार ३६ रुपयाची तडजोड वसूल)

४ जोडप्यांचा लोक अदालत मध्ये संसार जुळला-

रायगड जिल्ह्यातील लोकन्यायालयात जोडप्यांचा (पेण-२. रोहा-१. खालापूर-१) सामंजस्याने वाद मिटल्यामुळे संसार सुरळीत झाला आहे.

**मोटार अपघात प्रकरणांमध्ये २ कोटी ३९ लाख ७६ हजार सातशे इतकी नुकसान भरपाई मंजूर**

जिल्ह्यामध्ये एकूण २५ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून पक्षकारांना २ कोटी ३९ लाख ७६ हजार ७०० इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. अलिबाग येथील पक्षकारांचा जिल्हा न्यायाधीश क. १. डॉ. श्रीमती सृष्टी निळकंठ व पॅनलवरील न्यायाधिशांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत २७ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पश्चकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करुनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली.

या लोक न्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधिक्षक, रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. ए. एस. राजदेकर व न्यायाधीश तथा सचिव श्री. अमोल शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

# भिवंडी तालुक्यात परतीच्या पावसाचा जोर
## उभ्या भात पिकाची वाताहत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**



झिडके-अंबाडी : पावसाळा ऋतू सर्वसामान्यपणे माहे-सप्टेंबर अखेरपर्यंत असल्याची परिस्थिती असताना,गेल्या काही दिवसांपासून भिवंडी तालुक्यात परतीच्या पावसाचा जोर वाढलेला आहे.त्यामुळे हलवे भातपिक सद्यस्थितीत तयार होऊन ते कापणीच्या लायक झालेले आहे.परंतु गेल्या अनेक दिवसांपासून भिवंडी तालुक्यात परतीचा पाऊस दररोजच बरसत असल्यामुळे ' शेतकरी राजा' चिंताग्रस्त झालेला आहे.कारण पावसाची ही अशाच स्वरूपाची परिस्थिती यापुढे काही दिवसांपर्यंत राहिली तर,हातातोंडाशी आलेले भातपिक मोठ्या प्रमाणात नासाडी होऊन शेतकऱ्यांचे खूपच नुकसान होणार आहे,त्यामुळे शेतकऱ्यांची दिवसेंदिवस पडणाऱ्या पावसामुळे चिंता वाढत चालली आहे.

आजकाल भातशेती करणे शेतकऱ्यांला न परवडणारी अशीच आहे.महागडी बी-बियाणे,खते,विविध स्वरूपाची कीटकनाशक,न परवडणारी मजुरांची मजुरी,भाडे तत्त्वावर चालणारी अवजार,अशा अनेक स्वरूपाच्या दृष्टीने विचार करता, भातशेती ही न परवडणारी झाल्याने बहुसंख्ये शेतक?ी हे आपल्या एकूण शेतीपैकी आपल्या कुटुंबाला वर्षभर पुरेल एवढेच भातपिक आपल्या शेतात लागवड करीत असतात,हे भातपिक घेण्यासाठी पीककर्जाच्या रूपाने बॅंकेचे कर्जही घेत असतात,अशा एकूण परिस्थितीतून निसर्गाच्या संकटाला तोंड देऊन,येणारे पिक आपल्या पदरात कसे पडेल याची अपेक्षा करीत असताना,पावसाचा मोसम संपूनही बेभरवशाच्या पावसाने शेतकऱ्यांची होणारी हाणी त्यांच्यासाठी खूपच मोठी आहे.सध्या हलवे भातपिक हे कापणीच्या हंगामात असताना दररोजच्या पडणाऱ्या पावसाने नुकसानीचच असल्याने या परिस्थितीमुळे सध्या शेतकरी चिंताग्रस्त आहेत.


महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अंबरनाथ

**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२. अंबरनाथ (पूर्व) जि.ठाणे**

## निविदा सूचना

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) यांनी खालील कामांसाठी दोन लिफाफा प्रणालीतील सीलबंद निविदा फॉर्म आमंत्रित केले आहे. रिक्त निविदा फॉर्म कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.ज.व्य. विभाग, अंबरनाथ या कार्यालयात दिनांक ३०/०९/२०२४ ते ०४/१०/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत जारी केले जातील.

या कामाची सीलबंद निविदा दि.०७/१०/२०२४ रोजी १७.०० वाजेपर्यंत किवा आधी नमूद केलेल्या कोणत्याही कार्यालयात सादर करता येईल आणि शक्य असल्यास खालील नमूद तारखेला व वेळेवर म.जी.प्रा.च्या सक्षम प्राधिकरणाद्वारे उघडल्या जातील

| अनु. | निविदा सूचना क्रमांक | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | सुरक्षा अनामत रक्कम (४%) (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत रु. | म.जी.प्रा.कडे नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग | सिलबंद निविदा स्विकारण्याचा दिनांक व ठिकाण | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३१ (तिसरा पुकार) सन २०२४-२०२५ | M & R to Ambernath Water: Providing Services for Digitalization of all of the documents by scanning method at Ambernath Division Office, Ambernath | ४०६१४६/- | ४,०६५/- | एकूण रक्कम रु.१६,२५०/- (अ) प्रारंभिक रक्कम रु.८१२५/- (ब) चालू देयकातून वसूल होणारी रक्कम रु.८१२५/- | ३ महिने | ५९०/- | एम.एस.एम.ई. नोंदणीकृत कंत्राटदार / गुमास्ता लायसन्स कंत्राटदार / उद्यम आधार नोंदणीकृत कंत्राटदार | दि. ०७/१०/२०२४ रोजी १७.०० वाजे पर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२. अंबरनाथ (पूर्व) | दि. ०८/१०/२०२४ सेजी १२.०० वाजता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) |

**टिप-**

१) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, एमजेपी विभाग, अंबरनाथच्या सूचना फलकावर पाहिली जाऊ शकते, विनंती केल्यास त्याची प्रत विनामूल्य मिळू शकते.

२) अर्जासह खालील कागदपत्रे जमा करणाऱ्या कंत्राटदारांना रिक्त निविदा फॉर्म देण्यात येईल.
अ) वैध नोंदणी प्रमाणपत्र.
ब) रिक्त निविदा फॉर्मच्या किंमतीची भरपाई
क) जीएसटीसाठी नोंदणी प्रमाणपत्र

३) रिक्त निविदा फॉर्म पोस्टद्वारे पाठविल्या जाणार नाहीत. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे.

**(सही/-)**

**कार्यकारी अभियंता,**
**म.जी.प्रा.ज.व्य. विभाग,**
**अंबरनाथ,**

***जिमाका ठाणे जाहिरात /२०२४-२५/४५**

Maharashtra Jeevan Pradhikaran

## तिसरा हफ्ता बँकेत जमा...

पान १ वरून ▶▶ तिसऱ्या टप्प्यात सुरुवात झाली असून दिनांक २६ सप्टेंबर रोजी ३८ लाख ९८ हजार ७०५ भगिनींना ५८४.८ कोटी रुपयांचा लाभ हस्तांतरण करण्यात आल्याच त्यांनी सांगितलंय.

शिवाय उर्वरित महिलांना लाभ हस्तांतरणाची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे. सर्व पात्र भगिनींना महिन्या अखेरपर्यंत लाभ मिळणार आहे. ज्या भगिनींना आधी लाभ मिळाला होता, त्यांना तिसरा हप्ता आणि ज्यांना आधी तांत्रिक अडचणींमुळे लाभ मिळाला नव्हता, त्यांना यावेळेस तिन्ही हफ्ते एकत्र देण्यात आलंय, असे आदिती कटकरेंनी जाहीर केलंय.

रक्षाबंधनाच्या आधीच लाडकी बहीण योजनेचे जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मानधन एकत्र ३००० हजार रुपये बँक खात्यात जमा करण्यात आलंय. मात्र अर्जात त्रुटी असल्यामुळे अनेक महिला या योजनेपासून वंचित राहिले होते. पण आता ज्या महिलांनी आपल्या अर्जातील त्रुटी दूर केलेली आहे, अशा महिलांना तीन हप्त्याचे एकूण ४५०० रुपये दिले जात आहेत. त्यामुळे या महिलांची दसरा दिवाळी अतिशय जोरात असणार आहे. तर ज्या महिलांनी १ सप्टेंबरपासून अर्ज केलंय त्यांना फक्त १५०० रुपये मिळणार आहेत.

## ठाणे जिल्हा अग्रेसर

पान १ वरून ▶▶ जिल्हा विधा सेवा प्राधीकरणाचे सचिव ईश्वर सुर्यवंशी यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, श्रीनिवास अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोकअदालत संपन्न झाली. कर्ज वसुली न्यायाधिकरणकर्ज वसुली न्यायाधिकरण प्राधिकरणाद्वारे १०३ प्रकरणे निकाली काढून एकूण ३३,७७,६७,८४७ रु. इतक्या रक्कमेची तडजोड करण्यात आली. कौटुंबिक न्यायालयातील वैवाहीक प्रकरणांमधील वाद सामंजस्याने मिटविण्यासाठी व कौटुंबिक संबंध पुनःप्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले गेले. त्यामध्ये वैवाहीक वादाच्या एकूण ५१ प्रकरणांमध्ये यशस्वी समेट घडवून आला. त्यापैकी ०४ प्रकरणांत पती-पत्नी एकत्र नांदावयास गेले. एन आय ?क्ट कलम १३८ च्या धनादेश प्रकरणांतील जुनी प्रलंबित ९८५ प्रकरणे निकाली होऊन त्यात १२,७९,००,६२० रक्कमेची तडजोड करण्यात आली.

तसेच, इलेक्ट्रॉनिक साधनांचा मोठया प्रमाणात वापर, विदेशातील पक्षकारांची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थितीतून लोकअदालतीमध्ये सहभाग नोदविला व प्रकरणांत यशस्वी तडजोड करण्यात आली.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जिल्हा न्यायालय व अनिधस्त तालुका न्यायालयांची मिळून एकूण १०५ पॅनल्सद्वारे लोकअदालतमध्ये एकूण २००३४ प्रलंबित प्रकरणे व ११०९१ दावा दाखल पुर्व प्रकरणे असे एकूण ३११२५ प्रकरणे आपापसात तडजोडीने निकाली काढण्यात यश मिळाले.

**मयतांचे वारस व जखमींना दिलासा**

ठाणे जिल्हयात मोटार अपघात दावा नुकसान भरपाई प्रकरणात एकूण २१७ प्रकरणांत तडजोड होवून पिडीतांना रक्कम रू. २६,८०,४९,७२२/- भरपाई मंजूर करण्यात आली. या प्रकरणांपैकी ठाणे मुख्यालयातील पॅनल न्यायाधीश सोनाली एन. शाह यांच्या पॅनलकडे एकूण १७८ प्रकरणांमध्ये तडजोड होवुन रू. २२,८९,७१,७२२/- एवढी नुकसान भरपाई पिडीतांना मंजूर करण्यात आली.

### आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नांना यश

# कल्याण तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांसाठी भरघोस निधी







**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण तालुक्यातील ३५ ग्रामपंचायती मुरबाड विधानसभा मतदारसंघात समविष्ट आहेत. या ग्रामपंचायत अंतर्गत येणारी ६८ गावे व २४ पाड्यासाठी आंतर्गत रस्त्यासाठी या पंचवार्षिक मध्ये आमदार किसन कथोरे यांनी १०५ कोटी रुपये फक्त गावातर्गत रस्त्याच्या कॉक्रिटी कारणासाठी उपलब्ध करून दिले आहेत, रायते, घोटसई, फळेगाव, खडवली, जांभूळ, वसत, भिसोल, मनिवली, रेवती, वाहोली, मांजरली, दहागाव, पोई, चवरे, रोहन, केळणी, मामणोली, कुंदे, म्हस्कल, उशीद, काकडपडा, पाळसोली, वेहेले, गरसे, कोसले, वाळकस, बेहेरे, वावेघर, उतणे, निंबवली, वासंद्री, सांगोडे, कोंडेरी, गुरवली, आणखर, आणखर पाडा या गावांचा यात समावेश आहे

**खडवली ते टिटवाळा रस्त्यासाठी १३० कोटी रुपये निधी मंजूर.**

कल्याण तालुक्यातील खडवली ते टिटवाळा या रस्त्यासाठी आशिया बँके मार्फत १३० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आलेला आहे. आमदार किसन कथोरे यांनी यासाठी विशेष प्रयत्न करून हा निधी उपलब्ध करून दिला आहे. पडघा खडवली फाटा ते टिटवाळा असा हा रस्ता पूर्ण कॉक्रीट होणार असून या रस्त्या लगता येणाऱ्या आणे, खडवली, नडगाव, दानबाव, फळेगाव, रुंदे या ग्रामस्थांना या रस्त्याचा फायदा होणार आहे. हा रस्ता कॉक्रिटी होणार असल्याने नागरिकांना त्याचा खूप फायदा होणार आहे.

## शिवसेनेत प्रवेश...

पान १ वरून ▶▶ शर्मा, भाजप युवा मोर्चा उपाध्यक्ष अनंत कुळेकर, मनसे पदाधिकारी राधा चौधरी, सदानंद जाधव यांच्यासह आंबिवली येथील विश्वकर्मा परिवाराच्या ७० सदस्य आणि अनेक कार्यकर्त्यांनी यावेळी शिवसेना पक्षाचा भगवा ध्वज हाती घेतला. यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांनी जय श्रीराम आणि शिवसेना झिंदाबादची जोरदार घोषणाबाजीही केली.

तर भाजप जिल्हा सचिवांच्या या पक्ष प्रवेशाबाबत बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी भाजपला थेट इशारा दिला. भाजपच्या वरिष्ठ लोकांनी कल्याण पश्चिमेत अपक्ष निवडणूक लढविण्याच्या तयारीत असलेल्या भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार आणि शहराध्यक्ष वरुण पाटील यांना वेळीच समज द्यावी. अन्यथा आमच्या अखत्यारीत येणाऱ्या कल्याण पूर्व, डोंबिवली आणि मुरबाड विधानसभेत आम्ही गप्प बसणार नाही. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीमध्ये खंजीर खुपसण्याचे काम केल्यास त्याचे परिणाम संपूर्ण महाराष्ट्रात तुम्हाला दिसून येतील अशा शब्दांत शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी यावेळी भाजपला थेट इशारा दिला आहे.

तसेच या कार्यक्रमानंतर कल्याण पश्चिम शिवसेनेच्या विभाग संघटकांची मागासवर्गीय जिल्हा संघटक ह्या पदावर नियुक्ती झाल्याचे पत्रही जिल्हाप्रमुख अरविंद मोरे, आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते संबंधितांना देण्यात आले.

## पर्यटनाची सप्तसूत्री...

पान १ वरून ▶▶ उपायोजना आखण्यात आल्या होत्या. याच बरोबर सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या मात्र दुर्लक्षित असलेल्या पर्यटन स्थळांचा विकास करण्याबाबतच्या योजना आणि त्यासाठीच्या निधीची तरतूदही या धोरणात मांडण्यात आली होती. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन म्हणून उल्लेख केलेल्या मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासासाठी अनेक महत्वकांक्षी प्रकल्पांची उभारणी करत असतानाचा या क्षेत्राला 'पर्यटन हब' म्हणून विकसित करण्यासाठी आरखडा तयार करण्यात आला आहे.

पालघर, वसई, मरीन ड्राईव्ह आणि जुहू येथील सागरी किनाऱ्यांचा विकास करणे. सुमारे ३०० किमीच्या किनारपट्टीमध्ये प्रत्येकी १५ किमीच्या विभागात बोट फेरी पर्यटन विकसित करणे. तसेच मनोरंजन पर्यटनामध्ये चित्रपट सृष्टीचा अधिक प्रचार प्रसार करणे, मड आयलंड आणि अलिबाग येथील सागरी किनाऱ्यावर मनोरंजन केंद्र उभारणे. लंडन आयच्या धर्तीवर मुंबई आय प्रकल्प विकसित करणे तसेच विविध ठिकाणी संकल्प उद्यानांची उभारणी करणे. पर्यावरण पर्यटनामध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, नवी मुंबई तसेच ठाणे येथील खाडी पर्यटन, फ्लेमिंगो फेस्टिव्हल. तर सांस्कृतिक वारसा स्थळांमध्ये संपूर्ण एमएमआर क्षेत्रातील ऐतिहासिक वास्तू, किल्ले यांचा विकास करण्याबरोबर या स्थळांचा अधिक प्रचार प्रसार करण्यासाठी विविध महोत्सव भरविणे. तर प्रायोगिक पर्यटनामध्ये खारघर, मड आयलंड येथे गोल्फ कोर्स उभारणे, तसेच समुद्री किनारी विशेष उपाहारगृहांची उभारणी करणे यांसारख्या विविध गोष्टींचा सखल आढावा या विकास आराखड्यात मांडण्यात आला आहे.

**आर्थिक उलाढाल वाढविण्याचे ध्येय**

एमएमआर क्षेत्रातील विविध पर्यटन स्थळांना भेटी देणारा पर्यटक सद्यस्थितीत सुमारे १ ते २ दिवसात ८ ते १० हजार रुपये पर्यटन स्थळांच्या भेटीसाठी खर्च करतो. भविष्यात पर्यटकांचा मुक्काम या क्षेत्रात किमान ३ ते ४ दिवस असावा आणि सुमारे २५ हजार रुपये इतका असावा असे उद्दिष्ट पर्यटन विभागाकडून ठेवण्यात आले आहे.

**एमएमआर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास होती आहे. याच बरोबर येथील पर्यटन क्षेत्राला चालना मिळावी आणि विकासाबरोबरच हे क्षेत्र पर्यटन हब म्हणून विकसित करण्याचा मानस आहे. याच दृष्टीने पर्यटन विकास आरखडा तयार करण्यात आला आहे. तसेच यामुळे रोजगारालाा देखील चालना मिळणार आहे. - बी.एन.पाटील, संचालक, महाराष्ट्र पर्यटन संचालनालय**

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत भादवड येथे उमेदवार व औद्योगिक आस्थापनांचा मेळावा संपन्न



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असलेला मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्याकरता उमेदवार व औद्योगिक आस्थापनांचा मेळावा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भादवड, भिवंडी येथे यशस्वीरित्या संपन्न झाला. भिवंडी तालुक्यातील बारावी, आयटीआय पदवी पदविका आणि पदव्युत्तर शिक्षण झालेले विविध उमेदवारांनी या योजना रोजगार मेळाव्याचा लाभ घेतला. आयटीआय भिवंडी यांच्या पुढाकाराने व जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता व नवीन कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा घेण्यात आला. सदर मेळाव्यामध्ये गाला इंडस्ट्रीयस वाडा, योक टेक्सटईल्स, ब्लाझो टेक्स्टईल्स, एस आई इलेक्ट्रिकल व इतरही कंपन्यानी नोकरीस उत्सुक असलेल्या उमेदवारांकरिता जागा उपलब्ध करून देऊन सहभाग घेतला. या रोजगार मेळावा याचा फायदा ४८ उमेदवारांनी उपस्थित राहून घेतला व त्यापैकी २३ उमेदवारांना कंपन्यांमधून निवड करण्यात आलेली आहे.

आय.टी.आय प्राचार्यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे फायदे उमेदवारांना सांगितले. या उपक्रमाची माहिती संस्थेच्या प्राचार्या सीमा महाजन यांनी दिली. श्री विजय जाधव कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य सीमा महाजन यांच्यासह सर्व कर्मचारी विशेष परिश्रम घेतले.

# सन्मान श्रीशक्तीचा

## आमदार किसन कथोरेंच्या वाढदिवसानिमित्त देसले दांम्पत्याकडून नारीशक्ती व शिक्षकांचा सन्मान!






**दै.ठाणे जीवनदीप वार्ता मुरबाड -प्रतिनिधी :**

जनसेवक मनोज रमेश देसले व त्यांच्या पत्नी मुरबाड नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा मानसी मनोज देसले यांनी मुरबाड विधानसभेचे कार्यक्षम आमदार किसन कथोरेंच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन नारीशक्तिचा व शिक्षकांचा भव्य सन्मान सोहळा मुरबाड येथील माऊली गार्डन येथे भव्य दिव्य स्वरूपात आयोजित केला होता. आपल्या पतीच्या निधना नंतर कुंटुंबावर मोठे संकट येते आर्थिक स्थिती खालावते, अशावेळी मुलांचा सांभाळ करून त्यांना शिक्षण देणे खूपच कठीण होऊन जाते. स्वतः काबाडकष्ट, मेहनत करून आपल्या मुलांना उच्च शिक्षण देणार्या व त्यांना उदोग व्यवसाय, नोकरीला लावणार्या मुरबाड मधील अरूणा दतात्रय पष्टे , कविता धिरज थोरात, भारती चौधरी, मनिषा विशे , सुनंदा गायकवाड, बेबी शेलवले, भिमा केंबारी, निलम सोनावणे या कतृत्ववान महिलांचा यथोचित सन्मान यावेळी आमदार कथोरेंच्या हस्ते करण्यात आला. तसेच तालुक्यात शिक्षणाची बिजे गाव , वाडी वस्तिवर जाऊन पवित्र ज्ञानार्जनाचे काम करणारे आदर्श गुरूजनांचा सन्मानही यावेळी करण्यात आला. तर आलेल्या सर्व शिक्षकांसाठी लकी ड्रॉचे आयोजन करण्यात येऊन शंभर बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यामध्ये प्रथम बक्षिस अक्टिवा होंडाची गाडी सौ. सुरेखा कराळे या शिक्षिकेला लागली असून बक्षिस मिळाल्या चा आनंद सर्व शिक्षकांच्या चेहऱ्यावर दिसत होता. यावेळी उपस्थितांना आमदार कथोरे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तर अशा प्रकारच्या स्तुत्य व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल देसले दांम्पत् व त्यांच्या कमिटीचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमासाठी मुरबाड नगरपंचायत चे नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, भाजपाचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने तालुक्यातील शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होत्या.

## १२ जागांवर तडजोड नाही, माकप...

पान १ वरून ▶▶ शक्तींना गृहीत धरून जागावाटपाबाबत आपसात चर्चा करत आहेत. इतर डावे पक्ष व पुरोगामी शक्तींना अद्याप या प्रक्रियेत सामावून घेण्यात आल्याचे दिसत नाही. महाविकास आघाडीच्या अंतर्गत एकजुटीसाठी हे घातक आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये सुद्धा महाविकास आघाडीने लोकसभेच्या महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ४८ जागा तीन मुख्य पक्षांमध्ये वाटून घेतल्या व त्यानंतर इतर पक्षांच्या बरोबर त्यांचा केवळ पाठिंबा मिळवण्यासाठी चर्चा केली. माकपने तेव्हाही महाविकास आघाडीच्या प्रमुख पक्षांचे हे असे करणे चुकीचे असल्याबद्दल आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांच्या लक्षात आणून दिले होते. किमान विधानसभेच्या जागावाटपात तरी अशा प्रकारे आपसांत तीन पक्षांनी जागा वाटून घेऊन नंतर डावे पुरोगामी पक्ष व संघटनांबरोबर चर्चा सुरू करण्याची चूक होणार नाही याची काळजी घेण्याबद्दल विनंती केली होती. मात्र लोकसभेच्या वेळेस जे झाले तेच विधानसभेच्या वेळेस घडताना आज दिसत आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, इतर डावे पुरोगामी पक्ष व विविध जनसंघटनांनी शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी, युवक व महिलांच्या बाबतच्या विविध प्रश्नांवर सत्ताधारी भाजप व त्याच्या मित्रपक्षांच्या विरोधात वर्षानुवर्ष तीव्र संघर्ष केला आहे. जनतेच्या या संघर्षांमधून पुढे आलेल्या मागण्या व डावे पक्ष विविध प्रश्नांबाबत घेत आलेली धोरणे यांचे प्रतिबिंब महाविकास आघाडीच्या किमान समान कार्यक्रमात उमटावे असा आग्रहही पक्षाच्या वतीने महाविकास आघाडीच्या शिरस्त नेत्यांकडे लावून धरण्यात आला होता. मात्र याबाबतही कोणताही सकारात्मक प्रतिसाद अद्याप देण्यात आलेला नाही.

दुसऱ्या बाजूला हे प्रमुख तीनही पक्ष वेगवेगळया संवाद यात्रा, सभा व प्रसार माध्यमांमधील चर्चेच्या माध्यमातून माकपने व इतर डाव्या पक्षांनी लढवण्यासाठी सादर केलेल्या जागांवर आपले उमेदवार प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे केंद्रस्थानी आणत आहेत. महाविकास आघाडीतील या तीन पक्षांची ही कृती समन्वयाच्या व एकजुटीच्या प्रक्रियेस बाधा आणणारी आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीतील सर्व पक्ष, विविध जनसंघटना, वर्गीय संघटना, पुरोगामी विचारवंत, पत्रकार, बुद्धिजीवी या सर्वांनी अपार मेहनत घेऊन राज्यात महाविकास आघाडीच्या बाजूने वातावरण तयार केले होते. तेव्हा सर्वांनी आपली संपूर्ण ताकद लावली होती.

परिणामी महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. मात्र असे असले तरी महाविकास आघाडी व महायुती मधील मतांचे अंतर पाहता डाव्या शक्ती, विचारवंत, लेखक, विविध जनसंघटना, वर्गीय संघटना यांना दूर ठेवून महाविकास आघाडीला विधानसभा निवडणूक जिंकता येईल असे आकलन करणे अतिआत्मविश्वासाचे ठरू शकते.

देशाच्या जनतेत फूट पाडून जनविरोधी, धर्मांध, जातीय, भ्रष्ट व हुकूमशाही राजकारण करणाऱ्या भाजप व त्याच्या मित्रशक्ती संविधानाला व भारताच्या एकतेला धोका निर्माण करू पाहत आहेत. अशा पार्श्वभूमीवर संविधान, लोकशाही, धर्मनिरपेक्षता व भारतीय जनतेच्या हितरक्षणासाठी सर्व लोकशाहीवादी शक्तींची एकजूट अत्यंत आवश्यक बनली आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये ही एकजूट जास्त बळकट व्हावी यासाठी महाविकास आघाडीच्या नेतृत्वाने अत्यंत काळजीपूर्वक पावले टाकण्याची आवश्यकता आहे.

# 'स्वच्छता- वॉकेथॉनच्या' माध्यमातून स्वच्छतेची लोकचळवळ निर्माण होईल

## - केडीएमसी आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

**कल्याण :** 'स्वच्छता-वॉकेथॉनच्या' माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत एक चांगली लोकचळवळ निर्माण होईल असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी आज केले. स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत कल्याण डोंबिवली महापालिकेमार्फत स्वच्छतेविषयक जनजागृतीसाठी अनेकविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून आज आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांच्या पुढाकाराने एक- धाव- स्वच्छतेसाठी या जनजागृती मोहिमेअंतर्गत दुर्गाडी चौक ते महापालिका मुख्यालयापर्यंत वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी बोलताना आयुक्त




इंदु डॉ. राणी जाखड यांनी हे प्रतिपादन केले.

स्वभावऽस्वच्छताऽसंस्कारऽ स्वच्छता या संकल्पनेअंतर्गत स्वच्छता हीच सेवा मोहिमेला अनेक उपक्रमांच्या माध्यमातून आम्ही व्यापक चालना देत आहोत. या मोहिमेचा उद्देश नागरिकांमध्ये स्वच्छतेची जाणीव निर्माण करणे, तसेच शहर स्वच्छ ठेवण्याच्या दायित्वाची भावना अधिक दृढ करणे हा आहे. या मोहिमेअंतर्गत 'स्वच्छता संवाद' आयोजित करण्यात आले आहेत, ज्याद्वारे नागरिक आणि महानगरपालिका प्रतिनिधी एकत्र येऊन स्वच्छतेशी संबंधित समस्या आणि उपाययोजना यावर चर्चा करतात, या संवादातून केवळ समस्या सोडविण्याचेच काम होत नाही, तर शहरातील स्वच्छतेविषयीची सकारात्मक वर्तणूक बळकट होण्यासही मदत होते. नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता आणि त्यांच्या स्वच्छतेबद्दलच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल घडवून आणणे हाच या संवादाचा मुख्य उद्देश आहे असे त्या पुढे म्हणाल्या.

या वॉकेथॉनमध्ये पालिकेचे स्वच्छता ब्रँड अँबेसिडर डॉ. प्रशांत पाटील, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील, महापालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, महापालिकेचे इतर अधिकारी - कर्मचारी वर्ग यांचेसह विविध सामाजिक आणि क्रीडा गटांनी सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये डॉन बॉस्को स्कूल, कल्याण रनर्स, विरांगना ग्रुप, कल्याण डोंबिवली रनर्स, कल्याण सायक्लिस्ट ग्रुप, मानिनी महिला मंडळ, एव्हर ग्रीन सायकल प्रेमी, इनरव्हील क्लब ऑफ डोंबिवली-ईस्ट, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण या गटांचा सहभाग उल्लेखनीय होता. या उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती वाढवून, शहराच्या स्वच्छतेसाठी नागरिकांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला गेला.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी